# -: जाहिर निविदा :-

याद्वारे आपणास कळविण्यात येते की, या न्यायालयाचे आवारात जिल्हा व सत्र न्यायालय,नेवासा व दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, नेवासा या दोन्ही न्यायालयातील फक्त न्यायालयीन कागदपत्राच्या छायांकित प्रती काढणेसाठी विहित कार्य पध्दतीचा अवलंब करुन व मा. उच्च न्यायालयाच्या करारनाम्यातील अटी व शर्तीच्या अधिन राहुन नवीन झेरॉक्स सर्व्हीस प्रोव्हायडरचे कामासाठी अपंग व्यक्तीची किंवा इच्छुक व्यक्तींची झेरॉक्स सर्व्हीस प्रोव्हायडर म्हणुन नेमणुक करावयाची असुन त्यासाठी स्वत:ची झेरॉक्स मशीन असणे आवश्यक असुन झेरॉक्स कामाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

तरी, वरील कामासाठी इच्छुक व्यक्तींनी किंवा मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील रिट पिटीशन नं. ७४३/२०१३ अन्वये अपंग व्यक्तींना झेरॉक्स सर्व्हीस प्रोव्हायडर म्हणुन प्राधान्य देण्याचे असल्याने अपंग व्यक्तींनी आपले अर्ज दिनांक २३/०२/२०२४ अखेर सायंकाळी ०६.०० पर्यंत या न्यायालयात सादर करावेत. तसेच अपंग व्यक्तींना प्राधान्य दिले जाणार असल्यामुळे अर्जासोबत अपंग प्रमाणपत्राची सत्यप्रत जोडण्यात यावी.

तसेच मा. महोदयांच्या तोंडी आदेशान्वये झेरॉक्स सर्व्हीस प्रोव्हायडर म्हणुन नियुक्त करण्यात येणा-या व्यक्ती / फर्मकरीता झेरॉक्स आउटसोर्सिंगच्या कामासाठी ए-४ कागदाकरीता रुपये १-२५ पैसे, लिगल कागदाकरीता रुपये १-५० पैसे व ए-३ कागदाकरीता रुपये २-०० अशी रक्कम आकारण्यासाठी मंजुरी देणेबाबत विचाराधीन आहे. दिनांक २३/०२/२०२४ रोजी सायंकाळी ०६.०० नंतर येणा-या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

सदर बाबतच्या मा. उच्च न्यायालयाच्या करारनाम्यातील अटी व शर्ती या माहीतीसाठी अधीक्षक कार्यालय, जिल्हा व सत्र न्यायालय, नेवासा, जि. अहमदनगर, येथे उपलब्ध आहेत.

आज दिनांक १४/०२/२०२४ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी जाहिर नोटीस प्रसिध्द केली असे.

District & Addl. Sessions Court, Newasa, Dist-Ahmednagar

जा.क्र. ४१८ /२०२४ ))
जिल्हा व अति. सत्र न्यायालय, नेवासा ))
दिनांक- १४/०२/२०२४ ))

( व्ही. वाय. जाधव )
जिल्हा न्यायाधीश-१ व अतिरिक्त सत्र
न्यायाधीश नेवासा, जि.अहमदनगर

टिप :- अधिक्षक, जिल्हा व सत्र न्यायालय, नेवासा यांनी सदर जाहीर नोटीस खालील नमुद ठिकाणी बेलिफामार्फत संबंधीतांस निर्देशित होईल अशी बजावणी करुन त्याबाबत संबंधित बेलिफाने त्याबाबतचा अहवाल निम्नस्वाक्षरीकारांना सादर करावा.